दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● बुधवार दि.२० ऑगस्ट २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २६४ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Wednesday 20 August 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 264 ● Pages 4 ● Rate 4 Rs




प्रतिनिधी नेमणे आहे

लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा, तालुका, सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा.


# राज्यात अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सर्व यंत्रणांना सतर्कतेचे निर्देश

**मुंबई । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मंत्रालयातील राज्य आपत्ती व्यवस्थापन कक्षात संपूर्ण राज्यातील पावसाच्या स्थितीचा आढावा घेतला.यावेळी आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, माहिती तंत्रज्ञान मंत्री ड. आशिष शेलार, मुख्य सचिव राजेशकुमार, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, आपत्ती व्यवस्थापन अपर मुख्य सचिव सोनिया सेठी, कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव संजय दशपुते तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले. बैठकीत विभागीय आयुक्तांनी आपल्या विभागातील पावसाबाबतची माहिती सादर केली. रत्नागिरी, रायगड आणि हिंगोली जिल्ह्यांत अधिक पाऊस झाला असून, हवामान खात्याने १७ ते २१ ऑगस्टदरम्यान अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. त्यामुळे पुढील काही दिवस सतर्क राहण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले.मागील दोन दिवसांत राज्यात विविध घटनांमध्ये सात जणांचा मृत्यू झाला आहे.





कोकणातील काही नद्यांनी धोकापातळी ओलांडली असून जळगावमध्ये मोठे नुकसान झाले आहे. अलमट्टीबाबत कर्नाटक सरकारशी सातत्याने संपर्क ठेवला जात असून, सध्या धोका नसला तरी यंत्रणा सतर्क ठेवण्याचे आदेश मुख्यमंत्री यांनी दिले. मुखेडमधील परिस्थिती नियंत्रणात आली असून, विष्णुपुरीकडे विशेष लक्ष देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

छत्रपती संभाजीनगर विभागातील ८०० गावे बाधित झाली आहेत. दक्षिण गडचिरोलीत प्रशासन सतर्क आहे. अकोला, चांदूररेल्वे, मेहकर, वाशिम येथे परिस्थिती पूर्वपदावर येत आहे. विदर्भात प्राथमिक अंदाजानुसार २ लाख हेक्टर क्षेत्रावर पिकांचे नुकसान झाले आहे. मुंबईत आज सकाळपासून अवघ्या आठ तासांत १७० मिमी पाऊस झाला आहे. शहरात पाणी तुंबल्यामुळे दोन ठिकाणी वाहतूक प्रभावित झाली. रेल्वे, मेट्रो व इतर वाहतूक सुरळीत सुरू आहे. पुढील १० ते १२ तास मुंबईसाठी अत्यंत महत्वाचे असून, प्रशासनाने काळजी घेण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. उद्याच्या हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन शाळांना सुटी जाहीर करण्याचा अधिकार स्थानिक प्रशासन व महापालिकांना देण्यात आला आहे.मुख्यमंत्र्यांनी नागरिकांना दिलेल्या सूचनांमध्ये, एसएमएस अलर्ट पाठवताना वेळेचा अचूक उल्लेख करावा, येणारे अलर्ट गांभीर्याने घ्यावेत, स्वतःची काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले. तातडीच्या मदतीसाठी मंत्रालय गाठण्याची गरज नाही, स्थानिक पातळीवरच निधी व अधिकार देण्यात आले आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले.घरांच्या पडझडीसाठीची मदत, पंचनामे योग्य पद्धतीने करण्याचे निर्देशही देण्यात आले. धोक्याची पातळी वाढण्यापूर्वी अन्य राज्यांशी संपर्क साधण्यास सांगण्यात आले. पर्यटकांच्या ठिकाणी पोलिसांनी सतर्क रहावे, दरडी कोसळणाऱ्या भागात आधीच यंत्रणा कार्यरत करावी, तसेच निवारा केंद्रात भोजन, शुद्ध पाणी व पांघरूण यांची पुरेशी सोय करावी, असे आदेश मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी दिले.

### बीडमधील शेतकरी संकटात; केंद्राकडून मदतीचा हात द्या

# खा.बजरंग सोनवणेंनी केंद्रीय मंत्री अमित शहा यांची भेट घेवून केली मागणी

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात मागील चार दिवसांपासून पाऊस जोरदार हजेरी लावत असून जिल्ह्यामधील बहुतेक सर्वच महसुल मंडळामधे अतिवृष्टीची नोंद झालेली आहे. शेतातील पिके पाण्यात आहेत. दोन दिवसांपुर्वी खा.बजरंग सोनवणे यांनी थेट शेतात जावून नुकसानीची पाहणी केली होती. आज दि.१९ रोजी केंद्रीय मंत्री अमित शहा यांची दिल्ली येथे भेट घेवून अतिवृष्टीमुळे संकटात सापडलेल्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना केंद्र सरकारकडून मदतीचा हा द्या, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केली.



बीड जिल्ह्यातील शेतकरी बांधवांवर अतिवृष्टीमुळे मोठे संकट ओढावले आहे. राहती घरे, पीक, पशुधन, शेतीजमीन तसेच फळबागांचे प्रचंड नुकसान झाले आहे.या नुकसानीची दखल घेऊन शेतकऱ्यांना केंद्र सरकारकडून तातडीने मदत मिळावी, यासाठी खा.सुप्रिया सुळे यांच्या सोबत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. मागील काही दिवसांपासून जिल्ह्यात संततधार आणि मुसळधार पावसाची नोंद झालेली असून जिल्ह्यातील नद्यांना पूर गेलेला आहे. नदीपात्रापासून एक किलोमीटर अंतरापर्यन्त पिके पाण्याखाली आहेत. पावसामुळे पिकांचे, शेतीचे आणि घरांची पडझड होवूनही मोठी हानी झालेली आहे. केज तालुक्यातील काही गावात मांजरा नदीच्या पात्रातील पाणी शिरले होते. या पाण्यामुळे मोठ्या प्रमाणात पिकांचे आणि शेतीचेही नुकसान झाले होते. यानंतर तातडीने खा.बजरंग सोनवणे यांनी पूर्वनियोजीत दौरा रद्द करून शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष शेतात जावून पिकांची आणि नुकसानीची पाहणी केली होती. शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांनी धीर दिला होता. यानंतर मुख्यमंत्री आणि कृषीमंत्री यांना निवेदन पाठवून पंचनामे करणे व मदतीची मागणी केली होती. आज दि.१९ रोजी केंद्रीय मंत्री अमित शहा यांची भेट घेवून केंद्र सरकारच्या वतीने तातडीने मदत द्यावी, अशी मागणी केली. दरम्यान, गेल्या ४/५ दिवसांपासून झालेल्या संततधार पावसामुळे बीड जिल्ह्यामध्ये सर्वत्रच शेती पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. उपजाऊ मातीसह जमीन वाहून गेल्यामुळे पुढील काळासाठी काही क्षेत्र उजाड झाली आहेत. काही ठिकाणी घरांची पडझड झाली आहे तसेच गुरे दगावले असल्याची माहिती येत आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तात्काळ पंचनामे करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. झालेल्या नुकसानीचे फोटो व व्हिडिओ स्वत:कडे जतन करून ठेवावेत, तसेच नुकसानीबाबतची तक्रार फोटो, व्हीडिओसह तहसीलदार यांच्याकडे लेखी स्वरूपात सादर करावी. या प्रक्रियेत कुठलीही अडचण आल्यास माझ्या कार्यालयाशी संपर्क साधून मदत घ्यावी, असे अवाहनही खा.बजरंग सोनवणे यांनी जिल्ह्यातील शेतकरी व नागरिक यांना केले आहे.

# जि.परिषद प्राथमिक शाळा वानगावच्या विद्यार्थ्यांनी पाठवल्या सैनिकांना राख्या

### विद्यार्थ्यांनी या राख्या व शुभेच्छा पत्र स्वतः बनवले



**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद शाळेमध्ये विविध उपक्रम शिक्षकांमार्फत राबवले जातात त्यामध्ये हा आगळा उपक्रम वानगाव शाळेत राबविण्यात आला. रक्षाबंधन निमित्त भारतीय सीमेवर लढणाऱ्या जवानांसाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वानगाव या शाळेतील विद्यार्थ्यांनी स्वतः राख्या व शुभेच्छापत्र बनवून सीमेवर लढणाऱ्या जवानांना पाठवले आणि एक आगळावेगळा उपक्रम राबवला. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाणगाव या ठिकाणच्या इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी आपले कला कौशल्य दाखवत स्वतः टाकाऊ वस्तूंपासुन अगदी कमी खर्चामध्ये राख्या व शुभेच्छा पत्र बनवले व ते भारत पाकिस्तान सीमेवरील सैनिकांना पाठवल्या. अतिशय स्तुत्य व आगळावेगळा उपक्रम यावेळी शाळेच्या वतीने राबवण्यात आला. या वेगवेगळ्या उपक्रमामुळे सर्व पालकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. आपल्या येथील मन्मथ नरवडे यांना या राख्या पाठवल्या होत्या, त्यांनी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांसाठी बक्षीस म्हणून एक हजार रुपये खाऊ साठी दिले.

# स्वातंत्र्य दिनी पालकमंत्री अजित पवारांने उपोषणकर्त्यांचा केला स्मरणीय गेम

### बीड जिल्हाधिकारी प्रतीक्षा कक्षात बसवून ठेवले, उभाट्याने आले बाय, बाय,टाटा करून निघून गेले

**बीड । प्रतिनिधी**

७९ व्या स्वातंत्रय दिवसी उपोषणकर्ते जिल्हाधिकारी कार्यालयासमोर समस्या अडीअडचणी संबंधी किमान ४० उपोषणकर्ते उपोषणात सामील होते, स्वतंत्र दिवसी अथवा ज्या उत्सवी भारतीय इ ोड मंत्री प्रतिष्ठीत व्यक्ती राष्ट्रीय झेंडा फडकवण्यास प्रमुख अतिथी असतात. झेंडा फडकवल्यानंतर समस्याग्रस्त व्यक्ती, नागरीकांच्या भेटी घेवून त्यांना प्रशासन, शासन स्तरावर मदत करतात. पालकमंत्री या नात्याने मंत्री महोदय, हे कर्तव्य समजून भेट देतात. परंतू बीड जिल्ह्याला पालक मंत्री म्हणून अजित पवार यांनी पालकत्व स्विकारले असता ते उपोषणकर्त्याची दखल घेत नाहीत, मागच्या वर्षी ही यांनी उपोषणकर्त्यांची भेट घेतली नव्हती. यावर जनतेत उपोषणकर्त्यात रोष होता व



मिडीयाद्वारे नाराजी व्यक्त केली होती. सन २०२५ च्या स्वतंत्र दिनी पालकमंत्री म्हणून अजित पवार बीड येथे येत असल्यामुळे त्यांच्या कार्यकर्त्यांनी व पोलीस प्रशासनांने पवार साहेबांची भेट देतो, म्हणून उपोषणकर्त्यांचे अर्ज घेतले. कलम १४४ ची नोटीसाही दिल्या व १५ ऑगस्ट या दिवशी ११ वाजता जिल्हाधिकारी प्रतिक्षा कार्यालयात उपोषणकर्त्यांना डांबून ठेवले, अजित पवार उभाट्यानेच चालत प्रतिक्षा कक्षात आले व त्यांनी अर्ज स्विकारण्याचे ढोंग केले, हुंड्याचा नवरदेव फेटा बांधून सासरी मंडळीला जसा राम राम करतो. मनधरणी करण्याचे मनसुबे प्रगट करतो, त्याप्रमाणे सर्व काही घडले अजीत पवार यांनी उपोषणकर्त्यांस मनमोकळे संवाद केला नाही. त्यांच्या समस्या सोडवल्या नाहीत. देखावा करून निघून गेले, अजीत पवारांचे कार्यकर्ते व पोलीस यांनी उपोषणकर्त्यांची फसवणूक केली जिल्हाधिकारी, आरामशरी हे सर्व पाहात आहेत. उपोषणकर्ते आता या क्षणी जिल्हाधिकारी कर्यालयासमोर बसून आहेत. त्यांच्याकडे येथील प्रशासन व्यवस्था कसलेच सहकार्य करत नाही, ही शोकांतीका आहे, अशी प्रतिक्रीया माजी सैनिक प्रकाश वाघमारे यांनी दिली.

### गायरान मुक्तीसाठी आमरण उपोषणाचा विजय

# दलित नेते नगरसेवक कपिल मस्केंचा सामाजिक कार्याचा झंझावाद

### केज शहर व तालुक्यातून कार्यकर्त्यांची मोठी फळी उभारली

**केज । प्रतिनिधी**

दलित नेते नगरसेवक कपिल मस्के हे केज शहर व तालुक्यातील वंचित घटकांचे आवाज बनले आहेत. अगदी वयाच्या १५ व्या वर्षापासून त्यांनी फुले, शाहू, आंबेडकर व साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचे आत्मसात करून सामाजिक चळवळीत उडी घेतली.

फुलेनगर भागातून ग्रामपंचायत सदस्य म्हणून प्रवास सुरू करून पुढे नगरपंचायतीत नगरसेवकपदी पोहोचले. या काळात रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता यासारखी मूलभूत कामे तसेच वंचित घटकांसाठी विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात त्यांनी मोलाचा वाटा उचलला समाजाच्या न्यायासाठी लढताना कपिल मस्केंनी आमरण उपोषणाचा मार्गही स्वीकारला. केज शहरातील भू माफियांनी बळकविलेल्या गायरान जमिनीवर रमाईनगर



दलित वस्तीतील २० वर्षांपासूनचे अतिकृमण धारकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी तहसीलसमोर ३ दिवसीय आमरण उपोषण छेडले. या लढ्याला यश मिळवून देत त्यांनी गायरान मुक्तीसाठीचा लढा गाजवला. त्यावरच ते थांबले नाहीत तर त्यांनी रमाईनगर येथे विश्वाला शांतीचा संदेश देणारे तथागत गौतम बुद्धाच्या मुर्तीची प्रतिष्ठापना केली व त्याठिकाणी ते विपश्यना केंद्र व आभ्यासिकेसाठी पाठपुरावा करणार असल्याचे म्हटले आहे.

आज केवळ शहरातच नव्हे तर संपूर्ण तालुक्यात कपिल मस्के हे दलितांचे बुलंद नेते म्हणून ओळखले जातात. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक तरुण कार्यकर्ते समाजकारणात उतरले असून, मोठी कार्यकर्त्यांची फळी उभारली गेली आहे.

कपिल मस्केंच्या सामाजिक कार्याचा हा झंझावाद आगामी काळात आणखी व्यापक होईल आणि सामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी ते अधिक ताकदीने लढतील, असा विश्वास नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

संपादकीय

# आत्महत्यांचे वाढते प्रमाण

आत्महत्या या गंभीर आणि संवेदनशील विषयांवर आपण आज चर्चा करणार आहोत, हे खूप महत्त्वाचे आहे. आजकाल आत्महत्येचे प्रमाण वाढताना दिसत आहे आणि यामागे अनेक जटिल कारणे आहेत. या समस्येला समजून घेण्यासाठी आपण विविध पैलूंवर सविस्तर जाणून घेणे गरजेचे आहे. आत्महत्येचे वाढते प्रमाण त्याची कारणे आणि पार्श्वभूमी पाहिली असता लक्षात येते की, आत्महत्या फक्त एकाच कारणाने होत नाही. ती अनेक मानसिक, सामाजिक आणि जैविक घटकांचा परिणाम असते.काही प्रमुख कारणे जसे की मानसिक आरोग्याच्या समस्या, नैराश्य, चिंता, द्विध्रुवी विकार, सिझोफ्रेनिया आणि इतर मानसिक आजार आत्महत्येमागे सर्वात मोठे कारण आहेत. नैराश्यामध्ये व्यक्तीला निराशा, उदासी आणि भविष्याबद्दल नकारात्मकता वाटते, ज्यामुळे जगण्याची इच्छा कमी होते. अश्या आजारावर वेळीच उपचार केले गेले नाहीत तर व्यक्ती आत्महत्यांसारखे टोकाचे पाऊल उचलतो. सामाजिक आणि आर्थिक दबाव जसे की बेरोजगारी, आर्थिक नुकसान, कर्ज, कुटुंबातील समस्या, घटस्फोट, नातेसंबंधांमधील तणाव आणि सामाजिक बहिष्कृतता यामुळे व्यक्तीवर प्रचंड मानसिक दबाव येतो. आपण समाजाचा घटक म्हणून जगण्यास लायक नाही आहोत, आपल्यात उणीव, कमतरता आहे या नकारात्मक विचारांनी व्यक्ती घेरली जाते आणि आपल्या आयुष्यात, जिवंत राहण्यात काहीच अर्थ नाही अशी त्याची मनोमन खात्री होते. आजच्या धावपळीच्या जीवनात अनेक लोक एकटे पडले आहेत, कुटुंब विभक्त झाली आहेत, जग व्यावहारिक झाले आहे, माणुसकी नावाला उरली आहे. अशावेळी ज्यांना त्यांच्या भावना व्यक्त करण्यासाठी किंवा मदत मागण्यासाठी कोणीही नसते त्यावेळी घुसमट होऊन, मनातील दुःख, वेदना, अपेक्षा कोणालाच सांगू न शकल्याने या व्यक्ती आतून पूर्ण तुटलेल्या असतात आणि त्यातून त्या स्वतःला संपवण्याचा निर्णय घेतात.शारीरिक आजार हे सुद्धा आत्महत्या करण्यामागील एक सबळ कारण आहे. गंभीर आणि दीर्घकाळ चालणारे शारीरिक आजार ज्यामुळे व्यक्ती हताश होऊ शकते आणि आत्महत्येचा विचार करू शकते. आपण सतत वैद्यकीय मदतीच्या आधारे जगत आहोत, आपण कुटुंबातील लोकांसाठी ओझं आहोत, आपल्याला प्रत्येक हालचालींसाठी कोणावर अवलंबून आहोत हे स्वीकारणे अत्यंत कठीण असते. अनेकदा अशा आजारी व्यक्ती समाजाकडून, कुटुंबातील लोकांकडून झिडकारल्या जातात, त्यांना योग्य ती ट्रीटमेंट दिली जात नाही, त्यांना पूर्ण बरे करण्यासाठी प्रयत्न केले जात नाहीत त्यामुळे अशा व्यक्ती रुग्ण म्हणून आयुष्य काढण्यापेक्षा मेलेले बरे या नैराश्यातून स्वतःला संपवतात.वयोवृद्ध व्यक्ती ज्या आजारी पण आहेत, मुलं बाळं लक्ष देत नाहीत, इलाजासाठी पैसे नाहीत, अंथरुणाला खिळून आहेत त्यांना खूप मानसिक वेदनांना सामोरे जावे लागते. व्यसनाधीनतासुद्धा व्यक्तीला आत्महत्या करण्यासाठी प्रवृत्त करते. अनेकदा नशेत असतांना, स्वतःवरील संयम गेल्यामुळे, अती रागात, अती भावनेच्या भरात, गैरसमज होऊन, तर कधी कोणत्याही भांडणाचा राग अती प्रमाणात आल्यामुळे, आत्महत्या केल्या जातात. नशेमध्ये आधीच व्यक्ती मेंदू आणि मनावरील ताबा गमावून बसलेली असते त्यावेळी त्याला आत्महत्यापर्यंत न्यायला कोणतेही कारण पुरेसे ठरते. आत्महत्या करणाऱ्या व्यक्तीची मानसिकता समजून घेणे खूप महत्त्वाचे आहे. ही व्यक्ती सहसा अनेक भावना आणि विचारांमधून जात असते. असह्य वेदना म्हणजेच त्यांना वाटणारी मानसिक आणि भावनिक वेदना इतकी तीव्र असते की ती सहन करण्यापलीकडे जाते. त्यांना असे वाटते की या वेदना थांबवण्याचा एकमेव मार्ग म्हणजे जीवन संपवणे. कोणत्याही गोष्टीचा खूप मोठा आघात जेव्हा व्यक्तीवर अनपेक्षितपणे होतो, मनात जे योजले त्यापेक्षा भलतंच काही घडतं तेव्हा ती व्यक्ती खूप वेदनेमधून जातं असते परिणामी त्यावेळी तिला सावरणारे, समजून घेणारे कोणी उपलब्ध नसल्यास ती आत्महत्या हा पर्याय निवडते. निराशा आणि हताशता, म्हणजेच भविष्यात काहीही चांगले घडणार नाही, आता सगळं संपलं अशी त्यांची खात्री झालेली असते. त्यांना वाटते की परिस्थितीत कधीच सुधारणा होणार नाही आणि आहे या परिस्थितीमध्ये मी जगू शकत नाही, ही परिस्थिती मी स्वीकारू शकत नाही, यातून काहीच मार्ग शिल्लक नाही. ओझ्याची भावना येऊन व्यक्तीला असे वाटू लागते की ते त्यांच्या कुटुंबासाठी किंवा इतरांसाठी ओझे झाले आहेत. 'माझ्यामुळे इतरांना त्रास होतोय' ही भावना त्यांच्या मनात घर करते. विचारांची संकुचितता म्हणजे आत्महत्येचा विचार करणाऱ्या व्यक्तीला हा एकच मार्ग दिसतो. त्यांना इतर कोणताही पर्याय दिसत नाही. त्यांच्या समस्या कितीही मोठ्या असल्या तरी त्या सोडवता येऊ शकतात, हे त्यांना जाणवत नाही. हे लक्षात घेणे आवश्यक आहे, की ही व्यक्ती मरू इच्छित नाही, तर त्यांच्या वेदना थांबवू इच्छिते. समस्या हळूहळू सुटतात त्यासाठी योग्य दिशेने प्रयत्न, खूप संयमी वृत्ती, दूरदृष्टी आणि स्वतःशी स्वतःकडूनच झालेल्या चुकांबद्दल संवाद साधने, इतरांसमोर चुका कबूल करणे, आत्मपरीक्षण करणे उपयुक्त असते. जी व्यक्ती यासाठी कमी पडते ती कठीण परिस्थितीसमोर हार मानून आत्महत्या करते.आत्महत्येमागील मानसशास्त्रीय कारणे जाणून घेणे आपल्यासाठी फायदेशीर आहे. मानसशास्त्रानुसार, आत्महत्येचा विचार करण्यामागे काही विशिष्ट मानसशास्त्रीय प्रक्रिया कार्यरत असतात. उदा. 'मी अपयशी आहे', 'माझ्यासोबत नेहमीच वाईट घडते', 'कोणीही मला मदत करू शकत नाही' असे विचार त्यांच्या मनात येतात. जेव्हा एखादी व्यक्ती सतत नकारात्मक भावना अनुभवते, तेव्हा ती हताश होऊन आत्महत्येचा विचार करू शकते. जेनेटिक्स आणि न्यूरोबायोलॉजी याचा अर्थ काही संशोधनानुसार, आत्महत्येची प्रवृत्ती आनुवंशिक असू शकते. मेंदूमधील सेरोटोनिनसारख्या रसायनांची पातळी कमी असल्यास नैराश्य आणि आत्महत्येचा धोका वाढू शकतो.

# सरकार मित्र परिवारातर्फे भव्य दहीहंडी उत्सवाचे आयोजन–युवकांचा उत्साह उंचावला






**धुळे । प्रतिनिधी**

साक्री, पिंपळनेर शहरात सरकार मित्र परिवाराच्यावतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही भव्य दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले. समाजातील युवकांना विधायक व रचनात्मक मार्गावर ठेवत त्यांच्या उत्साह, आत्मविश्वास व धाडसाचे कौतुक करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार मंजुळाताई तुळशिराम गावित यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी युवकांनी अशा सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमातून समाजकार्यात सक्रिय सहभाग घ्यावा, यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि समाजात एकोपा निर्माण होतो असे प्रतिपादन केले. सुरुवातीला मान्यवरांच्या शुभहस्ते दहीहंडी पूजनानंतर कार्यक्रमाचे विधिवत उद्घाटन झाले. व्यासपीठावर शिवसेनेचे जिल्हा उपाध्यक्ष एड. ज्ञानेश्वर एखंडे, विधानसभा क्षेत्र प्रमुख संभाजी अहिरराव, स.पो.नि. किरण बर्गे, माजी उपसरपंच योगेश नेरकर, सरकार ग्रुपचे बंटी चौरे, अध्यक्ष आकाश (बाळा) चौरे, कार्याध्यक्ष अश्विन राठोड, उपाध्यक्ष राहुल बहिरम, सचिव सागर वाघ यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन से.नि.प्राचार्य एस.डी. पाटील यांनी केले. यावेळी अध्यक्ष बाळा चौरे यांनी आपुलकीची माणसं आणि समाजासाठी उभे राहणारे दाते मिळणं हीच खरी भाग्यरेषा आहे. त्यांच्यामुळेच सरकार मित्र परिवार भव्य दहीहंडीचा सोहळा दिमाखात साजरा करू शकतो असे मत व्यक्त करून सर्व दात्यांचे मनःपूर्वक आभार मानले. कार्यक्रमात जय बजरंग ग्रुप गोविंदा पथक व संतोषी माता ग्रुप गोविंदा पथक, पिंपळनेर यांना रु. ३३,३३३/- चे रोख पारितोषिक, करंडक, शाल व श्रीफळ देऊन गौरविण्यात आले. या उत्सवासाठी मंडप सुविधा नईम तांबोळी, बॅनर प्रिंटिंग प्रशांत जगताप (नाइस ग्राफिक्स), डी.जे. सुविधा बाबा मराठे, स्क्रीन फोटोग्राफी दीनानाथ अहिरराव, हायड्रोलिक सुविधा प्रकाश पाटील, म्बुलन्स सुविधा लहू वाघ यांनी उपलब्ध करून दिल्या. तसेच कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बाळा चौरे, अश्विन राठोड, राहुल बहिरम, सागर वाघ, केतन अहिरे, गौरव भामरे, रोहित गवळे, प्रशांत जगताप, रोहित बेनुस्कर, बंटी सोनवणे, महेंद्र बागुल, प्रशांत पवार यांनी मोलाचे योगदान दिले.सरकार मित्र परिवाराच्या उत्कृष्ट आयोजनामुळे पिंपळनेर शहरात दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष दिमाख प्राप्त झाला. पिंपळनेरमध्ये समाजहिताचे उपक्रम सातत्याने राबविण्यात आघाडीवर असलेल्या सरकार मित्र परिवार व सरकार ग्रुप यांनी पुन्हा एकदा युवकांना विधायक मार्गावर नेणारा आदर्श समोर ठेवला आहे. सामाजिक बांधिलकी आणि सेवाभाव या ध्येयाने प्रेरित होऊन त्यांनी केलेले हे आयोजन खरोखरच कौतुकास्पद ठरले.

# संगमेश्वर तालुल्यात सलग २१ तास वीजपुरवठा खंडित

## ग्राहकांमध्ये महावितरण विरोधात प्रचंड नाराजी;नियंत्रणासाठी अभियंते उपस्थित नाहीत

**संगमेश्वर । प्रतिनिधी**

संगमेश्वर तालुक्यात रविवारी रात्री ७:३० वा. खंडित झालेला वीजपुरवठा सलग २१ तास बंद होता. वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी आणि या कामाचे याचे योग्य नियोजन करण्यासाठी महावितरणचे अभियंता संगमेश्वर येथे उपस्थित नसल्याने पूर्ण तालुक्याचा विजापुरवठा सलग एकवीस तास खंडित होता. याबाबत संगमेश्वर तालुका वासियांनी महावितरण विरोधात तीव्र शब्दात आपली नाराजी व्यक्त करून या घटनेची अधीक्षक अभियंत्यांनी सखोल चौकशी करावी अशी मागणी केली आहे. रविवारी सकाळी ११ वाजता संगमेश्वर तालुक्याला वीजपुरवठा करणारी निवळी - संगमेश्वर ही ३३ केव्ही क्षमतेची वीज वाहिनी नादुरुस्त झाली. यानंतर ही वीज वाहिनी तत्काळ दुरुस्त करण्यासाठी कोणतीही हालचाल केली गेली नाही. दिवसभरात या वीजवाहिनीकडे योग्य नियोजना अभावी लक्ष दिले गेले नसल्याने निवळी संगमेश्वर वीजपुरवठा सुरू होऊ शकला नाही. निवळी संगमेश्वर ३३ केव्ही क्षमतेची वीज वाहिनी नादुरुस्त असतानाच रविवारी रात्री ७:३० वा. दरम्यान आरवली ते संगमेश्वर ही ३३ केव्ही क्षमतेची दुसरी वीज वाहिनी नादुरुस्त झाली. दोन्ही बाजूने संगमेश्वर तालुक्याला होणारा वीजपुरवठा खंडित झाला. महावितरणचे कर्मचारी संगमेश्वर आरवली या ३३ केव्ही विज वाहिनीवर दुरुस्तीचे काम करण्यासाठी रवाना झाले होते. मात्र मुसळधार पाऊस, रात्रीची वेळ आणि जंगल भागातून गेलेली वीज वाहिनी यामुळे आरवली संगमेश्वर ही ३३ केव्ही क्षमतेची वीज वाहिनी दुरुस्त होऊ शकली नाही, असे महावितरण तर्फे सांगण्यात आले. अन्यवेळी वीजपुरवठा खंडित होणार असेल तर महावितरण भ्रमणध्वनीवर संदेश पाठवून ग्राहकांना कल्पना देते. रविवारी खंडित झालेल्या वीज पुरवठा बाबत मात्र महावितरणने कोणत्याही प्रकारचे संदेश पाठवले नाहीत अथवा पत्रक काढून सोशल मीडियाद्वारे कोणतीही माहिती दिली नाही म्हणून संगमेश्वर तालुक्यातील ग्राहकांनी महावितरणच्या कारभाराबाबत तीव्र संताप व्यक्त केला. गणेशोत्सव आठवडाभरावर येऊन ठेपला आहे. अशा स्थितीत गणेश मूर्ती कारखान्यात मोठी लगबग सुरू आहे. मात्र सलग २१ तास वीज पुरवठा खंडित राहिल्याने गणेश मूर्ती कारखानदारांनी देखील महावितरण विरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. आरवली ते संगमेश्वर या ३३ केव्ही क्षमतेच्या वीजवाहिनीवर रविवारी रात्री थांबवलेले दुरुस्तीचे काम करण्यासाठी सोमवारी सकाळी महावितरणचे कर्मचारी रवाना झाले. रात्रभर खंडित असलेला संगमेश्वर तालुक्याचा विजपुरवठा सकाळी १० वाजेपर्यंत सुरू होईल अशी अपेक्षा होती. मात्र प्रत्यक्ष वीजपुरवठा सुरू होण्यास दुपारचे ४:३० वाजून गेले. योग्य नियोजनाअभावीच संपूर्ण संगमेश्वर तालुक्याला एकवीस तासांपेक्षा अधिक काळ वीज पुरवठ्यापासून खंडित राहावे लागले असा आरोप ग्राहकांनी केला आहे. गणेशोत्सव काही दिवसांवर येऊन ठेपलेला असताना महावितरण कडून सलग एकवीस तास वीज पुरवठा खंडित राहतो मग ऐन गणेशोत्सवात चांगल्या सेवेची हमी कशी मिळेल? असा सवाल ग्राहकांनी उपस्थित केला असून या घटनेकडे लोकप्रतिनिधींनी गांभीर्याने पाहिले नसल्याबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. महावितरणने संगमेश्वर तालुकावासीयांच्या भावनांचा अंत पाहू नये असे संगमेश्वर येथील सामाजिक कार्यकर्ते विनोद म्हस्के यांनी म्हटले आहे. संगमेश्वर येथील एक कनिष्ठ अभियंता दर शुक्रवारी सांगलीला आपल्या गावी निघून जातात. गावाहून सदर अभियंता सोमवारी कार्यालयात उपस्थित होतात. ज्यांच्याकडे उपअभियंता म्हणून जबाबदारी आहे, ते संगमेश्वर येथे न राहता देवरुख येथे वास्तव्याला असतात. रविवारी संगमेश्वर - निवळी आणि संगमेश्वर आरवली या दोन्ही मुख्य वीज वाहिनी नादुरुस्त झाल्या तेव्हा संगमेश्वर येथील दोन्ही अधिकारी आपल्या कर्तव्यावर उपस्थित नसल्याची गंभीर माहिती पुढे आली आहे. लोकप्रतिनिधींसह रत्नागिरी येथील महावितरणच्या अधीक्षक अभियंत्यांनी दीर्घकाळ खंडित राहिलेल्या संगमेश्वर येथील वीज पुरवठ्या बाबत सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी अशी मागणी ग्राहकांनी केली आहे.

**ऐन गणेशोत्सवात महावितरण कडून असाच बेजबाबदार कारभार केला गेला तर , ग्राहकांचा संताप उफाळून येईल. संगमेश्वर महावितरणच्या कारभाराला कोणीच वाली नाही अशी स्थिती यातून पुढे आली असल्याने लोकप्रतिनिधींसह महावितरणच्या अधीक्षक अभियंत्यांनी संगमेश्वर येथील खंडित वीजपुरवठा प्रकरणाची सखोल चौकशी करावी आणि संबंधितांवर योग्यती कारवाई करावी .**
**–राकेश जाधव, सामाजिक कार्यकर्ता, मौजे असुर्डे संगमेश्वर**

# ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर आपत्ती व्यवस्थापन संदर्भात बैठक

**संतोष पडवळ । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात सुरू असलेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील एकूण परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील नियंत्रण कक्षात सविस्तर बैठक झाली. यावेळी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयामधून कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार ॲड. निरंजन डावखरे व ठाणे शहर आमदार श्री. संजय केळकर यांनी या बैठकीत सहभाग घेतला. या बैठकीत जिल्ह्यातील आपत्ती परिस्थिती हाताळण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना, विभागांमधील समन्वय, तातडीच्या सेवा उपलब्धतेबाबतची तयारी तसेच नागरिकांच्या सुरक्षेसाठी करावयाच्या कार्यवाहीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.संबंधित विभागांना आवश्यक यंत्रणा सतत सज्ज ठेवण्याचे, बचाव पथके व साधनसामग्री तत्काळ उपलब्ध करून देण्याचे तसेच आपत्कालीन परिस्थितीत त्वरित प्रतिसाद देण्याचे निर्देश या बैठकीत मुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांनी दिले. माहितीचे वेगवान आदानप्रदान, नियंत्रण कक्षाची कार्यक्षमता आणि सर्व विभागांमध्ये योग्य समन्वय राखण्यावर विशेष भर देण्यात आला. तसेच नागरिकांना प्रशासनाच्या सूचनांचे पालन करण्याचे, अप्रमाणित माहिती किंवा अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आणि आवश्यकतेनुसार नियंत्रण कक्षाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले.या महत्त्वपूर्ण बैठकीस मंत्रालयातील नियंत्रण कक्षातून माननीय आपत्ती व्यवस्थापन मंत्री श्री. गिरीश महाजन, माननीय माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री तसेच मुंबईचे पालकमंत्री ॲड. आशिष शेलार, वरिष्ठ अधिकारी व संबंधित विभागाचे मान्यवर उपस्थित होते. या बैठकीत ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, ठाणे जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ हे उपस्थित होते. बैठकीदरम्यान अतिवृष्टीमुळे प्रभावित भागातील परिस्थितीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. बचाव व मदत कार्याची गती, पुनर्वसनाची तयारी, आरोग्य व सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना यावर चर्चा झाली. नागरिकांच्या सुरक्षेसाठी तातडीचे निर्णय घेण्यात आले. आमदार ॲड. निरंजन डावखरे यांनी या बैठकीत स्पष्ट केले की, राज्य सरकार व जिल्हा प्रशासन हे नागरिकांच्या सुरक्षेसाठी वचनबद्ध असून, अतिवृष्टीमुळे प्रभावितांना तातडीची मदत व योग्य पुनर्वसन मिळावे यासाठी ठोस आणि प्रभावी पावले उचलली जात आहेत.

# गरुड झेप अभियानाला राहुल कूल यांचा सक्रिय पाठिंबा ; शिव चातुर्य दिन साठी विधानसभेत मा.राहुल कूल यांची ठाम मागणी







**मुंबई । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या आग्र्याहून सुटकेच्या ऐतिहासिक घटनेचे स्मरण करण्यासाठी *१७ ऑगस्ट हा दिवस शिव चातुर्य दिन म्हणून शासकीय स्तरावर साजरा व्हावा*, यासाठी आमदार मा. राहुल कूल यांनी विधानसभेत विशेष लक्ष वेधले होते.दि. १२ जुलै २०२४ रोजी पावसाळी अधिवेशन - २०२५ दरम्यान शिवाजी महाराजांनी युवराज छत्रपती श्री. संभाजी महाराजांसह आग्र्याहून झालेली सुटका याची आठवण म्हणून १७ ऑगस्ट हा दिवस शिव चातुर्य दिन म्हणून साजरा करावा अशी मागणी सभागृहात केली होती. १७ ऑगस्ट हा दिवस 'शिव चातुर्य दिन' म्हणून शासन स्तरावर साजरा करण्यात येणार आहे असल्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी जाहीर केले होते आमदार राहुल कुल यांनी अधिवेशनात सातत्याने पाठपुरावा करून हा दिवस युवकांसाठी प्रेरणादायी ठरेल, असे ठळकपणे मांडले. शालेय व सामाजिक स्तरावर निबंध, व्याख्याने, गनिमी काव्यावरील कार्यशाळा यांसारखे उपक्रम सरकारने आयोजित करावेत, अशी त्यांची मागणी होती. आज ३५८ व्या शिवचातुर्य दिना*निमित्त गरुड झेप मोहीम संस्थेच्या आयोजनातून *आग्रा ते रायगड १३१० किमी पदयात्रा व सायकल रॅली** अभियानाचा भव्य शुभारंभ झाला. या मोहिमेला सुरुवातीपासून सक्रिय पाठिंबा देत *राहुल कूल आग्रा येथे प्रत्यक्ष उपस्थित राहिले* आणि युवकांना प्रेरक संदेश दिला. शिवाजी महाराजांचे पराक्रम पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचावेत, या उद्देशाने राहुल कूल यांचे प्रयत्न अधोरेखित होत असून, राज्य शासनाने शिव चातुर्य दिन अधिकृतरीत्या जाहीर करावा, अशी सर्व स्तरांतून जोरदार अपेक्षा आहे.

# होळ येथे माजी विशेष पोलिस महानिरीक्षक अंकुशराव शिंदे यांचा सेवापूर्ती निमित्त गौरव

## जंगी मिरवणूक काढून नागरी सत्कार; माजी मुख्य न्यायमूर्ती संभाजीराव शिंदे यांची विशेष उपस्थिती

**केज । प्रतिनिधी**


केज तालुक्यातील होळचे सुपुत्र,राज्याच्या व्हीआयपी सुरक्षा विभागाचे माजी विशेष पोलिस महानिरीक्षक अंकुशराव शिंदे हे नुकतेच सेवानिवृत्त झाले.त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी सेवापूर्ती सन्मान सोहळ्याचे आयोजन रविवारी दि.१७ आगष्ट रोजी सकाळी ११ वाजता होळ येथील हनुमान मंदिरात करण्यात आले.या सोहळ्यापूर्वीग्रामस्थांनी जंगी मिरवणूक काढून त्यांचे उस्फूर्त स्वागत केले. कार्यक्रमाला राजस्थान चे माजी मुख्यन्यायमूर्ती संभाजीराव शिंदे विशेष अतिथी म्हणूनउपस्थित होते.सोहळ्याचे अध्यक्षस्थान सरपंच अश्विनीताई शिंदे यांनी भूषविले.प्रमुख अतिथी मध्ये मांजरा साखर कारखान्याचे माजी कार्यकारी संचालक दत्ता शिंदे,माजीसरकारी वकील ॲड.प्रकाश शिंदे,पुणे सीआयडीचे माजी पोलीस उप अधीक्षक दीपक शिंदे, केंद्रप्रमुख रमेशकांबळे, माजीप्राचार्य डॉ.ज्ञानोबा सरवदे,बारामती ॲग्रोचे प्रबंधक अंकुश ढवारे, मुख्याध्यापक धर्मराज शिंदे,हृदयरोगतज्ज्ञ डॉ.नवनाथ घुगे, डॉ.गणेश ढवारे यांचा समावेश होता.यावेळी मान्यवरांचा होळ ग्रामस्थांच्या वतीने सपत्नीक सत्कार करण्यात आला. ग्रामस्थांच्या पुढाकाराने पार पडलेल्या या सोहळ्यास परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने हजेरी लावली. होळ गावातील दोन उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचा झालेला हा गौरव सोहळा ग्रामस्थांसाठी अभिमानाचा क्षण ठरला.यावेळी जिल्ह्यातील राजकीय, सामाजिक व प्रशासकीय क्षेत्रातील अनेक मान्यवरही यावेळी उपस्थित होते.

या सोहळ्यात संभाजीराव शिंदे व अंकुशराव शिंदे यांनी आपल्या मनोगतातून शालेय जीवनापासून ते आजवरच्या प्रवासातील अनेक आठवणींना उजाळा दिला.दोघेही बनेश्वर शिक्षण संस्थेचे माजी विद्यार्थीअसल्याने शिक्षण संस्थेबद्दल व होळच्या मातीतून मिळालेल्या संस्कारां बद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.त्यांच्या भाषणातून गावाशी असलेली घट्ट नाळ प्रकर्षाने जाणवली.



# मुंबईला पावसाने झोडपले

## मुंबईतील सर्व शाळा महाविद्यालय बंद!



**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबईतील सर्व शाळा महाविद्यालयांना आज ( दि. १९ ऑगस्ट२०२५ ) बंदर राहतील अशी माहिती बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने देण्यात आली.

भारतीय हवामान खात्याने (मंगळवार दि. १९ ऑगस्ट २०२५) रोजी मुंबई महानगरात ( मुंबई शहर आणि उपनगरे ) अति मुसळधार पावसाचा इशारा ( रेड अलर्ट ) दिला आहे. या पार्श्वभूमीवर बृहन्मुंबई महानगर पालिका प्रशासनाने मुंबईतील सर्व शाळा व महाविद्यालये बंद राहणार असल्याचे जाहीर केले आहे.मुंबईत आज मुसळधार पावसाने थैमान घातले. मुंबईच्या सखल भागात प्रचंड पाणी साठल्याने माने यांचे हाल झाले. रेल्वे आणि बस सेवा ही संत गतीने सुरू होत्या. वडाळा, संगम नगर, माटुंगा, दादर, चेंबूर आदी सखल भागात भागात कमरे एवढे पाणी साठले होते. त्यामुळे रिक्षा, बस वाहनांचा बोजवारा उडाला. चाकरमान्यांचे हाल झाले. रात्रीपासूनच पावसाची संतत धार सुरू होती. या दरम्यान पालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी आवश्यकता असेल तरच नागरिकांनी घराबाहेर पडावे आवाहन बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने केले. मुंबईला अतिमुसळधार पावसाचा इशारा (रेड अलर्ट) असल्याने विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेता मुंबईतील सर्व शाळा, महाविद्यालयांना आज, सोमवार दिनांक १८ ऑगस्ट २०२५ रोजी वरच्या सत्राला सुट्टी जाहीर करण्यात आली.भारतीय हवामान विभागाने बृहन्मुंबई क्षेत्रात आज, सोमवारी (दिनांक १८ ऑगस्ट २०२५) अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. या पार्श्वभूमीवर, सकाळपासून सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेता बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी मुंबईतील दुसऱ्या सत्रातील अर्थात दुपारी १२ वाजेनंतर भरणाऱ्या सर्व शाळा, महाविद्यालयांना आज सोमवार, दिनांक १८ ऑगस्ट २०२५ रोजी सुटी जाहीर करण्यात आली.आवश्यकता असेल तरच नागरिकांनी घराबाहेर पडावे, असे आवाहन बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून करण्यात येत आहे.काही आवश्यकता भासल्यास मदतीसाठी व अधिकृत माहितीसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मुख्य नियंत्रण कक्षाच्या १९१६ या मदतसेवा क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन पालिकेतर्फे करण्यात आले.

# अजित पवार 'ते' वक्तव्य करून मला टॉर्चर करतायेत:सभापती शिंदेंचा आरोप

**पुणे (वृत्तसंस्था)**–उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नुकतेच रोहित पवार यांना उद्देशून केलेल्या एका विधानामुळे राजकीय वर्तुळात पुन्हा एकदा चर्चांना उधाण आले आहे. 'जर भावकीचा विचार केला नसता तर तू आमदार झाला नसतास,' असे वक्तव्य अजित पवार यांनी केले होते. यावरून आता भाजपचे नेते आणि विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी अजित पवारांवर जोरदार टीका केली आहे. अजित पवार आपल्याला मानसिक त्रास देण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप राम शिंदे यांनी केला.



दहीहंडीनिमित्त बारामती दौऱ्यावर असताना माध्यमांशी बोलताना राम शिंदे यांनी आपला संताप व्यक्त केला. अजित पवार शिळ्या कढीला ऊत का आणत आहेत? असा सवाल करत त्यांनी, हे वक्तव्य करून ते सातत्याने मला 'टॉर्चर' करण्याचा प्रयत्न करत आहेत, असे म्हटले. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतरही अजित पवार यांनी रोहित पवारांना उद्देशून असेच वक्तव्य केले होते, आणि आता पुन्हा त्याचीच कबुली देत आहेत. अजित पवार राहून राहून सांगत आहे मी मदत केली, तर मी कसे म्हणणार मदत नाही केली, असे देखील राम शिंदे म्हणाले. असेही शिंदे म्हणाले.राम शिंदे पुढे म्हणाले, मी अधिक काही बोलणार नाही. मात्र मी या सगळ्याचा बळी ठरलो आहे. मी केवळ ६२२ मताच्या फरकाने पराभूत झालो आहे. अशा पद्धतीचे वक्तव्य वारंवार करुन अजित पवार मला टॉर्चर करत आहे. सातत्याने मला नाउमेद करण्याचा प्रयत्न करत आहे. महायुतीच्या वरिष्ठ नेत्यांनी या संदर्भात चर्चा केली पाहिजे.

इस्लामपूरमधील महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या प्रा. डॉ. एन.डी. पाटील विधी महाविद्यालय, श्रीमती सरोज नारायण पाटील (माई) मानसशास्त्र संशोधन केंद्र आणि प्रा. डॉ. एन. डी. पाटील बहुउद्देशीय सभागृहाचा उद्धाटन सोहळ्यासाठी आमदार रोहित पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार एकत्र आले होते. यावेळी दोघांमध्ये चांगलीच राजकीय जुगलबंदी रंगली.रोहित पवार यांनी व्यासपीठावरून पहिल्यांदा बोलताना दादा गावकीचा विचार करतात. मात्र, भावकीला विसरले असा टोला लगावला होता. यानंतर अजित पवार यांनी सुद्धा व्यासपीठावर बोलायला उभे राहिल्यानंतर रोहित पवारांच्या भावकीचा संदर्भ घेत चांगलाच पलटवार केला आणि माझ्या नादाला लागू नका, असा हसत हसत इशारा दिला. तसेच भावकीकडे लक्ष दिले म्हणून तू आमदार झालास. आपण बॅलेट पेपरवर निवडून आला आहे, जयंत पाटील जरा त्यांना सांगा असे म्हणत रोहित पवार यांच्या वक्तव्याचा चांगला समाचार केला.

# लोकनेते रामशेठ ठाकूर हे दानशूर कर्णाचा अवतार–उपमुख्यमंत्री अजितदादा पवार

**पनवेल । प्रतिनिधी**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर हे दानशूर कर्णाचा अवतार आहे. त्यांचा सारखा दिलदार पण हा मी कोणामध्येच पाहिला नाही. पैसे तर सगळेच कमावतात मात्र ते देण्याची दानत हि फक्त रामशेठ ठाकूर यांच्या मध्येच आहे. त्यामुळे मी महाराष्ट्राच्या तमाम १३ कोटी जनतेच्यावतीने त्यांचे अभिनंदन करतो असे गौरवोद्गार राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ईश्वरपूर येथे केले.सांगलीतील ईश्वरपूर येथे महात्मा फुले शिक्षण संस्था संचलित प्राध्यापक डॉक्टर एन.डी. पाटील विधी महाविद्यालय, श्रीमती सरोज पाटील मानसशास्त्र संशोधन केंद्र आणि डॉक्टर एन.डी. पाटील बहुउद्देशीय सभागृहाचे उद्घाटन शनिवारी मान्यवरांच्या उपस्थितीत झाले. यावेळी झालेल्या कार्यक्रमात डॉक्टर एन. डी. पाटील बहुउद्देशीय सभागृहासाठी जिल्हा योजना अनुदानातून दहा कोटी रुपये देण्याचे आश्वासन पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या वतीने राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. तसेच माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी एक कोटी रुपयांची तर आमदार रोहित पवार यांनी ४० लाख रुपयांची देणगी जाहीर केली. यावेळी संस्थेच्या जनरल सेक्रेटरी सरोज पाटील यांनी बहुउद्देशीय सभागृह वास्तूसाठी आर्थिक सहाय्य करण्याचे आवाहन केले आहे. हे तीनही उपक्रम केवळ संस्थात्मक विकासाची नवी पायरी नसून, शिक्षण, सामाजिक जागृती,



न्याय, कला-संस्कृती आणि मानसिक आरोग्य क्षेत्रात समाजाला बहुआयामी फायदे देणारी ऐतिहासिक पाऊल ठरणार आहेत. १९८२ मध्ये डॉक्टर एन. डी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन झालेला क.भा.पा. महाविद्यालयाचा मानसशास्त्र विभाग आज पीएच.डी. संशोधनाचे नामांकित केंद्र बनले असून, ग्रामीण व शहरी मानसिक आरोग्य क्षेत्रात ठसा उमटवला आहे. विभागातील ७ विद्यार्थ्यांनी पीएच.डी. मिळवली असून १३ जण सध्या संशोधन करत आहेत. मानसशास्त्र विभाग आणि नॅशनल युनिव्हर्सिटी, फिलिपिन्स यांच्यात उच्च शिक्षण, संशोधन, मानसिक आरोग्य, स्त्री सबलीकरण, तंत्रज्ञान आणि नवोपक्रम या क्षेत्रांत शैक्षणिक देवाणघेवाण व संयुक्त उपक्रम राबविण्यासाठी आंतरराष्ट्रीय सामंजस्य करार झाला आहे. या करारात डॉक्टर मिलिंद देशमुख यांचे महत्वपूर्ण योगदान असून, येत्या वर्षात महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी जागतिक स्तरावर शिक्षण व संशोधनाच्या सुवर्णसंधी उपलब्ध होणार आहेत. याचाच फायदा हा महाविद्यालयांतील संशोधन केंद्र मंजूर होण्याकरीता झालेला असून शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील पहिले मानसशास्त्र संशोधन केंद्र म्हणजेच सरोज पाटील मानसशास्त्र संशोधन केंद्राच्या कोनशिलेचे अनावरण तसेच प्राध्यापक डॉक्टर एन.डी. पाटील विधी महाविद्यालय आणि डॉक्टर एन.डी. पाटील बहुउद्देशीय सभागृहाचे उद्घाटन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार रोहित पवार, संस्थेच्या जनरल सेक्रेटरी सरोज पाटील यांच्यासह मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत शनिवारी झाले. यावेळी भाषण करताना राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की पैसे तर सगळे कमावतात मात्र ते देण्याची दानत हि फक्त रामशेठ ठाकूर यांच्या मध्येच आहे असे त्यामुळे मी महाराष्ट्राच्या तमाम जनतेच्यावतीने त्यांचे आभार मानतो असे म्हणाले. तर संस्थेच्या जनरल सेक्रेटरी सरोज पाटील यांनीही रामशेठ ठाकूर म्हणजे हिरा आहेत. गव्हाण गावातील एका अत्यंत गरीब कुटुंबात त्यांचा जन्म झाला. त्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांचा कमवा आणि शिका हा मंत्र घेऊन शिक्षण पूर्ण केले तसचे पुढे ते मोठे उद्योजक झाले. त्यांचे व्यक्तिमत्व हे अत्यंत प्रामाणिक, प्रेमळ आणि दयाळू असून त्यांनी १०० कोटीहून अधिक रूपये संस्थेला संस्थेला दिले आहे. त्यामुळे रामशेठ ठाकूर हे रयत शिक्षण संस्थेला लाभलेले रत्न आहेत, असे गौरवोद्गार काढले. यावेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनीही भाषण करणात म्हणाले की. डॉक्टर एन.डी. पाटील आणि सरोज पाटील यांनी माझ्यावर भरपूर प्रेम केले असून रयत शिक्षण संस्था हि माझी मातृसंस्था आहे. त्यामुळे संस्थेला जी काही मदत लागेल ती मी सर्वोतोपरी करेल असा शब्द दिला. या कार्यक्रमाला राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री चंद्रकांत पाटील, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, खासदार धैर्यशील माने, आमदार जयंतराव पाटील, रोहित पवार, बार कौन्सिल ऑफ इंडियाचे सदस्य, आशिष देशमुख, कोल्हापूर शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉक्टर डी. टी. शिर्के, शिक्षण संचालक डॉक्टर शैलेंद्र देवळाणकर, सांगलीचे जिल्हाधिकारी अशोक काकडे, पोलीस अधीक्षक संदीप घुगे, शिक्षण विभागाचे विभागीय सहसंचालक डॉक्टर प्रकाश बच्छाव, महेश चोथे यांच्यासह विविध स्थैर्यातीलक्षेत्रातील पदाधिकारी आणि मान्यवर उपस्थिती होते.

# महाराष्ट्रात २१ ऑगस्ट पर्यंत अतिवृष्टीचा इशारा विदर्भासाठी ऑरेंज अलर्ट

**मुंबई (वृत्तसंस्था)**–राज्यात मागील काही दिवसांपासून पावसाने दडी मारली होती, मात्र आता मुसळधार पावसाला जोरदार सुरूवात झाली आहे. रात्रभर पडलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक रस्ते जलमय झाले असून, सकाळपासूनही पावसाची संततधार सुरूच आहे. भारतीय हवामान विभागाने १६ ते २१ ऑगस्ट २०२५ या कालावधीसाठी अतिवृष्टी आणि वादळी वाऱ्याचा इशारा दिला आहे. पुणे जिल्ह्यात आज रेड अलर्ट जारी करण्यात आला असून, विदर्भासाठी ऑरेंज अलर्ट तर राज्यातील इतर भागांमध्ये येलो अलर्ट देण्यात आला आहे. विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे.मराठवाड्यातील नांदेड, हिंगोली, परभणी, छत्रपती संभाजीनगर, जालना आणि बीड या जिल्ह्यांत संततधार पाऊस सुरू असून, आज पावसाचा वेग आणखी वाढण्याची शक्यता आहे. भारतीय हवामान विभागाने ठाणे आणि मुंबईसाठीही आज मुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. त्यामुळे नागरिकांनी अत्यावश्यक कारणांशिवाय घराबाहेर पडणे टाळावे, असा सल्ला देण्यात आला आहे. सकाळी सुरू असलेल्या पावसाचा जोर दुपारी आणि सायंकाळीही कायम राहण्याची दाट शक्यता वर्तवण्यात आली आहे.

दिवा, डोंबिवली, कल्याण आणि कल्याणच्या ग्रामीण भागात मागील दोन तासांपासून मुसळधार पाऊस सुरू असून, काही भागांमध्ये पाणी साचले आहे. धुळे शहरात दीड तासाच्या पावसानंतर जिल्हा



रुग्णालयाच्या आवारात मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते, ज्यामुळे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. दरम्यान, जळगाव जिल्ह्यातील पारोळा तालुक्यातील शेळावे गावात ढगफुटी सदृश पावसामुळे चिखली नदीला पूर आला आहे.पुराच्या पाण्यात दोन गुरे वाहून गेल्याने त्यांचा मृत्यू झाला असून, घरांमध्ये पाणी शिरल्याने लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. या पूरस्थितीत अनेक कुटुंब बेघर झाली आहेत. शेळावे खुर्द आणि शेळावे बुद्रुक या दोन्ही गावांतील नदीलगतच्या वस्त्यांमध्ये चिखली नदीला अचानक आलेल्या पुरामुळे राहत्या घरांत पाणी शिरले. या घटनेची दखल घेत ग्राम महसूल अधिकारी आणि मंडळ अधिकाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी जाऊन नुकसानीचे पंचनामे केले आहेत.

# कर्जतचे कृषी संशोधन केंद्र जागतिक दर्जाचे होणार–डॉ.भरत वाघमोडे

**कर्जत । प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय भात संशोधन संस्था, फिलिपाईन्सकडून मोठमोठ्या नाविन्यपूर्ण संशोधन प्रकल्पास मान्यता मिळत असल्याने कर्जतचे कृषी संशोधन केंद्र लवकरच जागतिक दर्जाचे भात संशोधन केंद्र होईल, असा विश्वास सहयोगी संशोधन संचालक डॉ. भारत वाघमोडे यांनी व्यक्त केला. येथील प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राचा वर्धापन दिन मुख्य इमारतीच्या प्रांगणात उत्साहात साजरा करण्यात आला.त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.ते पुढे म्हणाले की,भात जलद पैदास प्रकल्प, महाअन्नपूर्णा - बदलत्या वातावरणानुरूप भात पिकावरील संशोधन प्रकल्प मंजूर झाल्याने जागतिक दर्जाचे संशोधन करण्यासाठी अद्ययावत सुविधा निर्माण होतील.त्यामुळे कोकणातीलच नव्हे तर राज्यातील भात उत्पादक शेतकऱ्यांना याचा फायदा होणार आहे.आता १४ वर्षांऐवजी ६-७ वर्षातच वेगवेगळ्या गुणवैशिष्ट्ये असलेल्या भात जाती विकसित करणे शक्य होईल. अद्ययावत भात लागवड तंत्रज्ञान देखील शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.देशातील मोजक्याच संस्थांत व महाराष्ट्रात फक्त कर्जत येथेच हा प्रकल्प सुरू होत असल्याचा उल्लेख करीत त्यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या. कृषी विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ.रवींद्र मर्दाने यांनी १४ ऑगस्ट १९१९ रोजी स्थापन झालेल्या या संशोधन केंद्राचा देदीप्यमान इतिहास,संशोधित झालेले विविध भात वाण आणि उत्पादनातील योगदान नेटक्या शब्दात विदित केले.सर्व शास्त्रज्ञ, अधिकारी, कर्मचारी व मजूर वर्गाने समर्पित भावनेने काम केल्यास केंद्राचा नावलौकिक जगभरात पोहचेल, असा विश्वास व्यक्त केला.

# गुजरांच्या लोककलांचे जतन, संवर्धन आणि जनजागृतीचा अनोखा संगम

**नंदुरबार । दिपक गोसावी**

नंदुरबार जिल्ह्यातील गुजर समाजाने आपल्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी एक स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे. दिनांक ८ ऑगस्ट २०२५ रोजी प्रकाशा येथे आयोजित करण्यात आलेल्या पारंपरिक भजन, गण, गवळणी, रास आणि ललीत या लोककलांच्या महोत्सवाला समाजातून प्रचंड प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमातून केवळ मनोरंजनापलीकडे न जाता, सामाजिक आणि पर्यावरणीय जबाबदारीचे भानही ठेवल्याचे दिसून आले.




या महोत्सवाचे मुख्य उद्दिष्ट, समाजाच्या पारंपारिक लोककलांना आजच्या पिढीसमोर सादर करणे आणि त्या जिवंत ठेवणे हे होते. विविध शहर व ग्राम लेवा पाटीदार ग्लोबल गुजर मंडळाने आयोजित केलेल्या या उपक्रमात, तब्बल २९ भजनी मंडळांनी सहभाग घेतला. यात नंदुरबार जिल्ह्यासह गुजरात राज्यातील भजनी मंडळांचा समावेश होता. या कलाकारांनी आपली कला सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

हा महोत्सव केवळ सांस्कृतिक उपक्रम नव्हता, तर सामाजिक जबाबदारीचेही प्रतीक होता. यानिमित्ताने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते, ज्यात अनेक नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान केले. त्याचबरोबर, पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यासाठी ३०० झाडांच्या रोपांचे वाटप करण्यात आले. या दोन्ही उपक्रमांमुळे महोत्सवाला एक वेगळीच सामाजिक उंची प्राप्त झाली. विशेष म्हणजे, या महोत्सवात समाजातील महिला आणि बालकांनीही मोठ्या संख्येने सहभाग घेतला. लहान मुलांनी तबला आणि पेटी वाजवून आपली कला सादर केली, ज्याचे विशेष कौतुक करण्यात आले. तरुण पिढीचा आणि महिलांचा हा सहभाग, समाजाच्या सांस्कृतिक परंपरेला भविष्यातही कायम ठेवण्याची ग्वाही देतो.या कार्यक्रमाला गुजर समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष दिपक पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अभिजीत पाटील, निझर येथील महामंत्री जगदीश पाटील, सद्गुरु धर्मशाळेचे चेअरमन मोहन चौधरी,तसेच माजी आदिवासी विकास मंत्री डॉक्टर विजयकुमार गावित, नंदुरबार येथील डीवायएसपी संजय महाजन यांच्यासह समाजातील अनेक प्रतिष्ठित व्यक्ती आणि भजनी मंडळांचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सर्व भजनी मंडळांना प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.हा महोत्सव केवळ एक कार्यक्रम न राहता, समाजाला एकत्र आणणारा, कला आणि संस्कृतीचे जतन करणारा आणि सामाजिक संदेश देणारा एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे.

## रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) पक्षाच्या बिड जिल्हा प्रसिद्धी प्रमुखपदी बाळासाहेब जाधवांची निवड

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील उमरी या गावचे रहिवाशी बाळासाहेब मधुकर जाधव यांची रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर)या पक्षाच्या बीड जिल्हा प्रसिद्धी प्रमुख पदी निवड झाली आहे.



या बाबतीत सविस्तर वृत्त असे की केज येथील शासकीय विश्राम ग्रह येथे दिनांक १२ रोजी दुपारी ३ वाजता ,रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर)या पक्षाची बैठक संपन्न झाली.

बैठकी प्रसंगी बीड जिल्हा प्रसिद्धी प्रमुख पदी बाळासाहेब मधुकर जाधव यांची निवड करण्यात आली. ही निवड रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) या पक्षाचे राष्ट्रीय नेते दीपक (भाऊ)निकाळजे यांच्या आदेशाने व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) या पक्षाचे मराठवाडा अध्यक्ष भगवंत (आप्पा) वायबसे यांच्या उपस्थितीत करण्यात आली.या निवडीमुळे बाळासाहेब जाधव यांच्यावर शुभेच्याचा वर्षाव होत आहे.

या प्रसंगी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) या पक्षाचे मराठवाडा अध्यक्ष भगवंत (आप्पा) वायबसे, मराठवाडा प्रवक्ता ज्ञानेश्वर गिरी, मराठवाडा संपर्कप्रमुख सौ आम्रपाली गजेशिव,महिला केज तालुका अध्यक्ष बचुटे मॅडम,महादेव केदार,किरण कसबे,विशाल नवगिरे,आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्हास्तरीय कला उत्सव स्पर्धा २०२५: विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी

**नंदुरबार । दिपक गोसावी**

जिल्ह्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी 'समग्र शिक्षा' अंतर्गत कला उत्सव स्पर्धा २०२५-२६ चे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षीच्या स्पर्धेचा विषय विकसित भारत-२०४७ मधील भारताची कल्पना असा आहे. नंदुरबार जिल्ह्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळांमधील ९ वी ते १२ वी मध्ये शिकणारे विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी होऊ शकतात. यात शासकीय, शासकीय अनुदानित, खाजगी शाळा, नगरपालिका परिषद आणि कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय यांचा समावेश आहे.

ही स्पर्धा वैयक्तिक (डेश्रे) आणि समूह अशा दोन्ही प्रकारात होणार आहे. स्पर्धेचा पहिला टप्पा म्हणजेच जिल्हास्तरीय स्पर्धा २८ ऑगस्ट २०२५ रोजी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नंदुरबार येथे होणार आहे.स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी २५ ऑगस्ट २०२५ पर्यंत https://forms.gle/33ei1t XQKzszWxVo9 या लिंकवर आपले नाव नोंदवणे आवश्यक आहे. २५ ऑगस्टनंतर नावनोंदणी बंद केली जाईल.शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद नंदुरबार, प्रवीण अहिरे आणि प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, नंदुरबार, डॉ. राजेंद्र महाजन यांनी सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांना या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. ही स्पर्धा विद्यार्थ्यांच्या कलाकौशल्याला प्रोत्साहन देणारी एक महत्त्वपूर्ण संधी आहे.

## नवी मुंबई विमानतळाला दि.बा. पाटील यांचे नाव देण्यासाठी डोंगरावर मानवी साखळी उभारून जनजागृती

**पनवेल । प्रतिनीधी**

लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला देण्यात यावे, या मागणीसाठी विमानतळ प्रकल्पग्रस्त व बाधित शेतकऱ्यांनी पनवेल तालुक्यातील नांदगाव येथील डोंगरावर मानवी साखळी उभारून जनजागृतीचा ठोस संदेश दिला.या आंदोलनातून नवी मुंबई विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव द्यावेच लागेल या मागणी बरोबर

विमानतळ प्रकल्पग्रस्तांनी दोन महत्त्वाच्या मागण्या केल्या

१. विमानतळ प्रकल्पासाठी जमीन देऊनही प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना आजवर ना योग्य मोबदला मिळाला, ना रोजगाराची हमी पूर्ण करण्यात आली. BVG, OCS आणि Adani यांसारख्या प्रायव्हेट कंपन्या शेतकऱ्यांच्या हक्कांकडे सतत दुर्लक्ष करून जबाबदारीपासून पळ काढत आहेत. या अन्यायाविरोधात प्रकल्पग्रस्तांनी ठामपणे प्रतीकात्मक विरोध नोंदवला.

२. सिडकोकडे अद्याप अनेक प्रश्न प्रलंबित आहेत, त्याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, ही मागणीही विमानतळ प्रकल्पग्रस्तांनी स्पष्ट केली. प्रकल्प बाधित शेतकऱ्यांना विमानतळ कंपन्यांमध्ये शेअर्स कबूल केलेले असूनही अकरा वर्षांनंतर आजतागायत ते शेअर्स देण्यात आलेले नाहीत.या मानवी साखळीच्या माध्यमातून विमानतळ प्रकल्पग्रस्तांनी आपली एकजूट व हक्कांसाठीची लढाऊ भूमिका अधोरेखित केली असून, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव देण्याची मागणी अधिक ठामपणे पुढे नेण्यात आली आहे.

# विकासाच्या नावाने आमच्या समृद्ध संस्कृतीला पोहोचते ठेच

### विश्व आदिवासी दिन : मोलगी येथील कार्यक्रमात उमटला सूर

**मोलगी । रविंद्र वळवी**

नैसर्गिक खाद्यसंस्कृती, राहणीमान, रितीरिवाज, परंपरा, पेहराव व वाद्ये यातून समृद्ध तथा आदर्श ठरलेली आदिवासी संस्कृती आज भोगवाद, प्रस्थापित व भांडवलशाहीमुळे धोक्यात आली. मानवी मुल्यांनी गर्भश्रीमंत असलेल्या या संस्कृतीला ठेच पोहोचली. शिवाय प्रकृती पूजत धरती वाचवण्याची आदिवासींनी ठेवलेली ताकदही कमी करण्याचा प्रयत्न सातत्याने केला जात आहे, असा सूर आदिवासी गौरव दिनानिमित्त मोलगीत झालेल्या कार्यक्रमात उमटला.




सातपुड्याच्या चौथ्या रांगेतील सांस्कृतिक राजधानी मोलगी येथे आदिवासी एकता परिषदेमार्फत विश्व आदिवासी दिवस साजरा झाला. वाद्य ढोल, पिरी, पावी या वाद्यांच्या सूर-तालावर बिरसा मुंडा चौकापासून सांस्कृतिक रॅली काढली. रॅलीत आदिवासी सोंगाड्या पार्टी किसन ण्ड नामू यांच्या रोडाली, सांस्कृतिक गीते सर्वांचे आकर्षण ठरले. सोंगाड्या नामू वळवी, किसन गावीत, राधा या सहकलाकारांनी आपल्या कलेतून आदिवासी क्रांतिकारकांची जाणीव करुन दिली.मुख्य कार्यक्रमात अध्यक्षस्थानी मधुकर वसावे होते. तर माजी पोलीस पाटील रतनसिंग वसावे, माजी जि.प.सदस्य सी.के.पाडवी, किरसिंग वसावे, सीताराम राऊत, निर्मला राऊत, करमसिंग पाडवी, प्रमोद वसावे,ड.सरदार वसावे, रामा तडवी, बाज्या वळवी, बाप पार्टीचे पदाधिकारी वाड्या वळवी, खेमसिंग वळवी, धावपटू तथा उपजिल्हाधिकारी किसन तडवी, रामसिंग वळवी, राजस्थानमधून रवींद्र बरझड आझाद, रुपलाल परमार, कन्हैयालाल खराडी, जयसिंह झोडिया, अरविंद शर्मा, ब्रिजलाल पाडवी, राकेश पाडवी आदी मान्यवर उपस्थित होते. दरम्यान ड.सरदार वसावे यांनी दाही दिशेने भरकटलेल्या आदिवासी बांधवांच्या भूमिकेबाबत चिंता व्यक्त केली. किसन तडवी यांनी प्रत्येक आदिवासी पालकांनी मुलांना खेळांमध्ये सहभाग घेण्यासाठी प्रोत्साहित करण्याचे आवाहन केले. किरसिंग वसावे यांनी विकासाची आवश्यक ठराव करण्याचे आवाहन केले. याशिवाय निर्मला राऊत, प्रदीप तडवी, सरपंच दिलीप वसावे, रामसिंग वळवी, बाज्या वळवी यांनीही मनोगत व्यक्त केले.

## मौजे कोल्हेवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह मोठ्या उत्साहात संपन्न

**केज । प्रतिनिधी**

दि.१८आगष्ट २०२५ रोजी ह.भ.प.ज्ञानेश भक्त व्याकरणाचार्य अर्जुन महाराज लाड (गुरुजी)श्रीक्षेत्र भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्था होळ,यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेला मौजे कोल्हेवाडी ता.केज येथील अखंड हरिनाम सप्ताह,वर्ष ३२ वे
दिनांक ११ ऑगस्ट ते १८ ऑगस्ट २०२५ या कालावधीत मोठ्या उत्साहात पार पडला.




यावर्षीच्या सप्ताहाचे एक वेगळे वैशिष्ट्य म्हणजे,श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा होय.भागवताचार्य ह.भ.प.श्रीराम महाराज चोले यांच्या मधुर वाणी तून गावकऱ्यांना सर्व प्रथम भागवत कथा श्रवण करण्याचे भाग्य लाभले.विशेष करून या भागवत कथेला महिला मंडळींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.तसेच तरुण युवकांनी यावर्षीच्या या कार्यक्रमात वाढता सहभाग नोंदवला.परंपरेनुसार याही वर्षी व्याकरणाचार्य ह.भ.प. अर्जुन महाराज लाड (गुरुजी)यांचीकाल्याच्या कीर्तनाची सेवा मोठ्या उत्साहात पार पडली. या कार्यक्रमाला पंचक्रोशीतील व परिसरातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. महाप्रसादा नंतर सप्ताहाची सांगता झाली.

## रमाई घरकुल योजनेतील जाचक अटी रद्द करा सर्वपक्षीय शिष्टमंडळाची मागणी

### बीड न.प.सिओ शैलेश फडसे तुघलकी फर्मान रद्द करावे-अशोक वीर

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरासह संपूर्ण राज्यभर रमाई घरकुल आवास योजना ही मागासवर्गीयांसाठी हक्काचे घर मिळावे म्हणून सुरू करण्यात आली आहे. रमाई घरकुल आवास योजनेच्या जीआर व नियमानुसार ज्या लाभार्थ्यांकडे नगरपालिकेचा मालकी हक्काचा पी.टी.आर आहे. त्या लाभार्थ्यांना घरकुल योजना लागू होते. व ते पात्र लाभार्थी असतात. बीड शहरात अनेक वर्षांपासून रमाई आवास घरकुल योजना चालू असून आज तागायत आहेत अनेकांनी या योजनेचा मालकी हक्काचा पीटीआर देऊन लाभ घेतला आहे. बीड नगरपालिकेचे नव्याने रुजू झालेले सी ओ शैलेश फडसे यांनी आजबच कारभार सुरू केला आहे. त्यांनी महंमद तुगलकासारखे नवीन नियम नवीन कायदे आणले आहेत. ते तात्काळ रद्द करावेत.जागेची रजिस्ट्री पेपर, पी आर कार्ड, या गोष्टीची आवश्यकता नसताना मागणी करत आहेत. घरकुल हे फक्त मालकी हक्काच्या पी.टी.आर वर मिळते तोच सक्षम पुरावा असतो. तोच ग्राह्य धरून सर्व मंजूर लाभार्थ्यांना घरकुलाचा निधी वितरित करावा अशा मागणीचे निवेदन बीड शहरातील सर्व पक्षीय शिष्टमंडळाने दिले आहे. तात्काळ या मागणीचा विचार करून बीड शहरातील रमाई घरकुल आवास योजनेच्या मंजूर लाभार्थ्यांना निधी वितरित करण्यात यावे अशी मागणी सर्वपक्षीय नेते मंडळीकडून करण्यात आली आहे. या शिष्टमंडळात अशोक वीर, बबन वडमारे,सनी वाघमारे,खुर्शीद आलम, विनोद सवाई, अशोक वाघमारे आदी उपस्थित होते.



## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई,शाखा केज च्या वतीने पत्रकार चंद्रकांत पाटील यांचा ५४ वा वाढदिवस साजरा

**बीड । प्रतिनिधी**

आयुष्य हा एक सुंदर प्रवास आहे,एक नदी सारखा जो सतत वाहत असतो.प्रत्येक दिवस नवा अनुभव घेऊन येतो,पण वाढदिवस हा एक विशेष दिवस असतो.हादिवस आनंद, खुशी आणि नवीन आशा घेऊन येतो.

वाढदिवस म्हणजे आपल्या प्रियजनां सोबत एकत्र येऊन त्यांचा खास दिवस साजरा करण्याचा, आनंद आणि उत्सव अनुभवण्याचा वेळ आहे.हा दिवस जीवना तील यश,स्वप्ने आणि प्रेम साजरे करण्याची एक खास संधी देतो.



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई,शाखा केज च्या वतीने संघातील सर्व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पत्रकार तथा महाराष्ट्राचे पत्रकार संघ मुंबई शाखा केजचे तालुकाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांचा ५४ वा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

चंद्रकांत पाटील यांच्या वर वाढदिवसाच्या निमित्ताने विविध क्षेत्रा तून शुभेच्छांचा वर्षाव झाला. यामध्ये केज नगरपंचायतच्या नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड,
बाजीराव ढाकणे जिल्हा समन्वयक गो-शाळा जलदुत, पर्यावरण प्रेमी तथा जिल्हा समन्वयक महा एनजीओ फेडरेशन महाराष्ट्र राज्य,भारतीय नमो संघाचे प्रदेश अध्यक्ष भाऊसाहेब घोडके यांनी वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन केले आहे.यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा केजचे उपाध्यक्ष प्रदीप गायकवाड, सचिव विजय बिक्कड, कार्याध्यक्ष नंदूलाल मिसाळ,प्रसिद्धीप्रमुख पांडुरंग कसबे,पत्रकार हिराचंद काळे,पत्रकार सचिन साखरे आदी पत्रकार बांधव उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077